# ब्राह्मणेत्तर चळवळीला राजश्री शाहू महाराजा यांचे योगदान

**डॉ.विजय जालिंदर देठे** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर.

.................................................................................................................................

**प्रस्तावना :**

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिशांनी ज्ञानविज्ञान, तंत्रज्ञान व आधुनिक संस्कृती भारतात आली. ब्रिटिश प्रशासन व्यवस्थेचा व नव्या जीवनशैलीचा परिणाम भारतातल्या समाजजीवनावर झाला. परिणामी भारतात सामाजिक सुधारणा व जनजागृती निर्माण होण्यास सुरुवात झाली. येथूनच भारतीय प्रबोधनकाळ सुरु झाले. याच दरम्यान १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रात काही चळवळी झाल्या ज्याने सामाजिक आणि सांस्कृतिक बदल घडवून आणला. यापैकी ब्राह्मणेत्तर चळवळ हि एक अत्यंत प्रभावी चळवळ होती. ब्राह्मणेत्तर चळवळीचा उदय हा सत्यशोधक चळवळीतून झाला. १९७३ ला महात्मा फुले यांनी सत्यशोधक समजाची स्थापना केली. या समाजाची तत्त्वे हि ब्राह्मणेत्तर चळवळीचे सैद्धांतिक आधार होते. गैर-ब्राह्मण जे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि शैक्षणिकदृष्ट्या दुर्बल होते त्याच्या उद्धारासाठी व सामाजिक साध्य करण्यासाठी तसेच सांस्कृतिक आणि राजकीय हक्क प्राप्त करून देण्यासाठी ज्योतिराव फुले नंतर या चळवळीचे नेतृत्व शाहू महाराज यांनी केले. शाहू महाराज यांनी सत्यशोधक चळवळीचे पुनर्जीवन केले पण यातूनच त्यांनी ब्राह्मणेत्तर चळवळीच्या उदयाला प्रोत्साहन दिले.

**उद्देश :**

१. ब्राह्मणेत्तर चळवळीचा अभ्यास करणे
२. शाहू महाराज व ब्राह्मणेत्तर चळवळ यांचा सहसंबध अभ्यासणे
३. ब्राह्मणेत्तर चळवलिच्या विकासात शाहू महाराज यांची भूमिका अभ्यासणे

**ब्राह्मणेत्तर चळवळीचा उदय :**

ब्राह्मणवर्गाच्या धार्मिक वर्चस्वाविरुद्ध ब्राह्मणेतरांनी केलेली चळवळ म्हणजे ब्राह्मणेतर होय. महात्मा फुले हे बहुजनसमाजातून पुढे आलेले होते. मानवाच्या मूलभूत स्वातंत्र्यावर त्यांची श्रद्धा होती. या श्रद्धेतूनच त्यांनी सत्यशोधक चळवळ सुरू केली. १८७३ साली स्थापन झालेल्या सत्यशोधक समाजाला सुरुवातीला चांगले अनुयायी मिळाले. विश्राम रामजी घोले, कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, मारुतराव नवले, रामचंद्र हरी शिंदे, रामशेट उधवणे, संतूजी लाड या सत्यशोधकांनी चळवळीचे क्षेत्र व्यापक बनविण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाचा प्रभाव कमी झाला. देशाचे वातावरण हळूहळू बदलत होते. तुरळक प्रमाणात कोठे सत्यशोधकी जलसे होत असले, तरी एकोणिसाव्या शतकात निर्माण झालेले पुरोहितशाहीविरुद्धचे वातावरण बरेचसे निवळत गेले. पण सन १८९९ मध्ये शाहू महाराजा यांच्या बाबत निर्माण झालेल्या वेदोक्त प्रकरणामुळे सामाजिक संघर्षातून पुढे ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाला तोंड फुटले. राजोपाध्ये यांनी छत्रपतींच्या घराण्याला वेदोक्ताचा अधिकार नाकारला. महाराजांना शूद्र ठरवले. परिणाम ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापूरात सत्यशोधक कार्यकर्त्यांची सभा होऊन ‘श्री शाहू सत्यशोधक समाज’ स्थापन करण्यात आला. या चळवळीला भास्करराव जाधव, हरिभाऊ चव्हाण व श्रीपतराव शिंदे इत्यादी कार्यकर्ते निर्माण झाले व त्यांनी याची व्याप्ती वाढवली. सत्यशोधकांची चळवळ ही महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तरांची पहिली चळवळ होती पुढे या ब्राह्मणशाहीच्या मक्तेदारीविरुद्ध व अन्यायाविरुद्ध अत्यंत प्रखर पणे लढा उभारला व शाहू महाराज यांनी कोल्हापुरात पुनर्जीवित केलेली सत्यशोध चळवळीचे पुढे स्वरूप ब्राह्मणेत्तर चळवळीने घेतले. म्हणूनच १९१७ साली भारतमंत्री लॉर्ड मॉंटेग्यू यांनी नवीन घटनात्मक सुधारणांची घोषणा केल्यानंतर सत्यशोधक चळवळीचे खऱ्याखुऱ्या अर्थाने ब्राह्मणेत्तर चळवळीत रूपांतर झाले. यात शाहू महाराजांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**शाहू महाराज व ब्राह्मणेत्तर चळवळ**

सत्यशोधक चळवळीतून उदयास आलेल्या ब्राह्मणेत्तर चळवळीचा काही काळ नेतृत्व शाहू महाराजांनी यांनी केले. त्या आधी त्यांनी सामाजिक सुधारणा कोल्हापूर समस्था सुरु केल्या होत्या त्यामध्ये संस्थांच्या प्रशासनात ब्राह्मणांचा प्रभाव कमी केला, ब्राह्मणांचे प्रशासन मंडळातील वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न, हुजूर ऑफिसच्या निर्मितीने ब्राह्मण वर्चस्व कमी केले. प्रशासनात ब्राह्मणेत्तर वर्गातून भरती करण्यास सुरुवात केली आणि त्यासाठी त्यांनी संस्थानच्या नोकऱ्यांत मागासवर्गाला ५० टक्के आरक्षण देण्याचा कायदा केला. असे प्रयत्न त्यांनी करून समाजातील बहुजन वर्गाला पुढे आणण्याचे कार्य केले. सत्ता असल्याशिवाय कोणतेच कार्य करतात येत नाही त्यासाठी त्याला राजकीय सत्ता निर्माण करावी असे आव्हान बहुजन समाजाला केले. त्यांच्या या आव्हानाला ब्राह्मणेत्तर समाजातील नेत्यांनी प्रतिसाद दिला आणि ब्रिटीशांच्या राजकीय सुधारणांची घोषनेत ब्राह्मणेत्तर समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान मिळावे यासाठी ब्राह्मणेत्तरांच्या वतीने लोकजागृतीची मोहीम सुरू केली. परिणामी शाहू महाराजांवर ब्राह्मणेत्तरांना भडकावता असा आरोप झाला. तरीही राजर्षी शाहू महाराज यांनी ब्राह्मणेत्तरांच्या व विशेषत: दलित, अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांबाबत आग्रही होते. यावेळी महाराष्ट्रातही ब्राह्मणेत्तर समाजाने आपल्या

हिताच्या संरक्षणासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली यामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादास धार चढून ब्राह्मणेत्तर चळवळ अधिक गतिमान केली.

कोल्हापूर संस्थाचे शाहू महाराज एक मांडलिक संस्थानिक असल्याने त्यांना ब्रिटिशांच्या विरोधात राजकारणात उघडपणे भाग घेण्यास येत नसले तरी ब्राह्मणेत्तरांच्या चळवळीत त्यांनी मदत केली. त्यांनी चार-पाच वर्षे ब्राह्मणेत्तर चळवळीची सूत्रे आपल्या हाती ठेवली व तिचे संचालन केले.

ब्राह्मणेत्तर चळवळीचा प्रसार व प्रचार करण्यात वृत्तपत्रांची भूमिका महत्वाची असून या वृत्तपत्रांना सक्रिय उत्तेजन शाहू महाराज यांनी दिले आहे. वृत्तपत्रांच्या क्षेत्रात आतापर्यंत ब्राह्मण वर्गाचीच मक्तेदारी होती व बहुतेक सर्व ब्राह्मणी वृत्तपत्रे ब्राह्मणांच्या हिताची जपणूक करणारीच होती. ब्राह्मणेत्तर बाजू समर्थपणे मांडणारी वृत्तपत्रे चोहीकडे काढली जावीत यासाठी राजर्षी प्रयत्नशील होते. १९१७-१९२२ या कालखंडात शाहूंनी ब्राम्हणेतर संपादकांना नवीन पत्रे काढण्यास प्रोत्साहन दिले. त्यातूनच महाराष्ट्रातील प्रत्येक ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रास त्यांनी नैतिक व आर्थिक बळ उभे केले. तसेच ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रांत आपापसांत वाद त्यांनी मिटवले. त्याच्या प्रोत्साहनाने 'डेक्कन रयत', 'दीनमित्र', 'गरीबांचा कैवारी', 'तरुण मराठा', 'विश्वबंधू' 'भगवा झेंडा' 'राष्ट्रवीर' 'जागरुक', 'संजीवन', 'सत्यप्रकाश', 'सुधारक', 'संदेश' 'ब्राम्हणेतरांचा केसरी''विजयी मराठा' 'राष्ट्रवीर', 'प्रबोधन' या वृत्तपत्रांना आर्थिक मदत व प्रेरणा दिली. त्यांनी वृत्तपत्राबाबत मित्र, मार्गदर्शक व सल्लागाराची भूमिका निभावली.

शाहू महाराजांचा ब्राह्मणेत्तर चळवळींला मद्रासकडील ब्राह्मणेत्तर चळवळीशी कार्यप्रणाली व कार्याची जाणीव होऊ यासाठी मद्रासकडील ब्राह्मणेत्तर चळवळीशी साधलेला संपर्क व तिच्या नेत्यांशी केलेले विचारांचे आदान-प्रदान केले. त्यांनी 'जस्टिस' पत्राच्या कार्यालयास भेट देऊन ब्राह्मणेत्तर पक्षाच्या नेत्यांशी चर्चा केली. त्यांनी ब्राह्मणेत्तरांची परिषद भरवून ब्राह्मणेत्तर चळवळीच्या सक्षमीकरणासाठी नेटाने प्रयत्न केला.

शाहू महाराज यांनी बहुजन समाजाला न्याय्य हक्क मिळविण्यासाठी बहुजन समाजाला राजकीय हक्क मिळवून देणे आवश्यक असून यातून सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्रांती प्रथम समान मानवतावादी भूमिकेतून करणे व स्वराज्याचा पाया भक्कम करणे, हाच हेतू राजर्षी शाहू महाराजांचा होता. त्यानुसार नवीन मॉंटफर्ड सुधारणा हक्काप्रमाणे कौन्सिलच्या निवडणुकाही ब्राह्मणेत्तर चळवळीनी राजकीय पक्षात रुपांतर करून आपले राजकीय हक्क घेतले पाहिजे. तसेच राजकीय सुधारणांचे हक्क मिळाल्यानंतर या सुधारणा राबवाव्यात व या सुधारणांप्रमाणे कायदे मंडळावर बहुजन समाजातले पुढारी निवडून जावेत असे त्यांना वाटू लागले. यातूनच शाहू महाराजाच्या प्रेरणेने ब्राह्मणेत्तरांची राजकीय चळवळ उदयास आली व ब्राह्मणेत्तर पक्षाची स्थापना झाली.

अशा पद्धतीने शाहू महाराज यांनी शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील कार्यातून ब्राह्मणेत्तरांत राजकीय जाणीव जागृती निर्माण करून ब्राह्मणेतर चळवळीला दिशा देण्याचे कार्य केले आहे.

**समारोप :**

शाहू महाराज यांनी सत्यशोधक चळवळीचे पुनर्जीवन केले पण यातूनच त्यांनी ब्राह्मणेत्तर चळवळीच्या उदयाला प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांनीच महात्मा फुले यांच्यानंतर ब्राह्मणेत्तर समाजाच्या उन्नतीचे कार्य हाती घेतले. यामुळे ब्राह्मणांना विरोध ब्राह्मणेत्तरांचा नेतृत्व शाहूकडे आले. या ब्राह्मणेत्तर चळवळीतून अनेक नेतृत्व उदयास आले. शाहू महाराजांनी धार्मिक आणि सामाजिक अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाचे महत्व ओळखून त्याचा प्रसार करण्याचे धोरण अवलंबले. राजर्षी शाहूंना ब्राह्मणेतर चळवळीमध्ये सक्रिय झाले. समाजाचे उन्नतीकरण करण्याचे कार्य केले. त्यांनी सुरवातीला सत्यशोधक चळवळ व या चळवळीतून उदयास आलेल्या ब्राह्मणेत्तर चळवळीला सहाय्य केले. त्यांनी ब्राह्मणेत्तर चळवळीला राजकीय स्वरूप प्राप्त करून दिले.

**संदर्भसूची:**

१. कीर धनंजय, शाहू महाराजांचे सल्लागार (लेख), साळुंखे पी.बी. (संपा.),(१९७६) "राजर्षी शाहू गौरव ग्रंथ", महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई

२. केशव हरेल, (२००५), "राजर्षी शाहू महाराज यांचे राजकीय विचार" कोल्हापूर .

३. चव्हाण रा.ना., (१९७५), छ. शाहू: राजनीती आणि स्वराज्य चळवळ (लेख), भोसले एस.एस. (संपा.) "राजर्षी शाहू : काळ, विचार आणि कार्य", जिल्हा परिषद कोल्हापूर.

४. जाधव रमेश,(१९९२)," राजर्षी शाहू छत्रपती वाद आणि वास्तव", महालक्ष्मी प्रकाशन, कोल्हापूर.

५. फडके य. दि. (संपा), (१९८४), "दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय", म.फुले समता प्रतिष्ठान प्रकाशन, पुणे.